महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645
दुरध्वनी क्रमांक : ०२२ - २४०७७४४१

क्र. मासं/रवका/न.क्र.५/
एक्स्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला, प्लॉट नं.१, धारावी रोड,माटुंगा,
मुंबई ४०० ०१९
email : cgmp@mahadiscom.in
website : www.mahadiscom.in

**प्रशासकीय परिपत्रक क्र. ६२२ दिनांक ०३ /०३ / २०२१**

विषय : **आकस्मिक आजारांच्या यादीमध्ये कोविड-१९ (COVID-१९) या आजाराचा नव्याने समावेश करणेबाबत.**

सामान्य आदेश क्र.२० (क) दि. १७.०६.१९६३ अंतर्गत तत्कालीन म.रा.वि. मंडळातील अधिकारी व कर्मचारी यांना वैद्यकीय प्रतिपूर्ती व इतर लाभ देण्याबाबतच्या तरतुदी विषद केलेल्या आहेत, तदनंतर सदरच्या तरतुदी म.रा.वि.वि.कंपनी मर्यादित कंपनी अंतर्गत देखील लागू करण्यात आलेल्या आहेत. या संदर्भात सा.आ. क्र. २० (क) दि. १७.०६.१९६३ चे सुधारपत्र क्र.५९ दि. २०.०८.१९९४ व सुधारपत्र क्र.६२ दि. १०.०५.१९९४ अन्वये गंभीर वैद्यकीय आजार/शस्त्रक्रिया करावे लागणा-या आणि आकस्मिक आजारांची यादी प्रसृत करण्यात आलेली आहे.

२. आता, महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, यांचा शासन निर्णय क्रमांक वैखप्र-२०२०/ प्र.क्र.६६/ राकावि-२ दि. १७.१२.२०२० अन्वये शासन निर्णय क्र.एमएजी २००५/९/प्र.क्र.१/आरोग्य ३ मुंबई दि. १९.०३.२००५ मधील विनिर्दीष्ट करण्यात आलेल्या एकुण २७ आकस्मिक आजारांमध्ये कोविड-१९ (COVID-१९) या आकस्मिक आजाराचा समावेश करण्यात आलेला आहे.

३. सबब, मा.अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक यांनी संचालक (वित्त), संचालक (संचलन), संचालक (प्रकल्प), संचालक (वाणिज्य) व संचालक (मासं) यांचेशी विचारविनिमय करून कोविड-१९ (COVID-१९) हा आजार म.रा.वि.वि.कं.मर्या. मधील आकस्मिक आजारांच्या यादीमध्ये अनुक्रमांक १६ वर नव्याने समाविष्ट करण्यास मंजुरी प्रदान केलेली आहे. याप्रकरणी शासनाच्या धर्तीवर खालील अटी व शर्तींची पूर्तता करणे आवश्यक आहे.

१) वैद्यकीय खर्च प्रतिपूर्तीसाठी रुग्णाचे कोविड - १९ बाधित असल्याने वैद्यकीय अहवालात नमूद असले पाहिजे तसेच रुग्णाच्या रक्तातील SPO2 (प्राणवायू पातळी) ही ९५ टक्के पेक्षा कमी असणे आवश्यक आहे.

२) सदर दि. १७.१२.२०२० रोजीचा शासन निर्णय दि. ०२.०९.२०२० पासून पूर्वलक्षी प्रभावाने लागू राहतील.

४. तरी, सामान्य आदेश क्र.२० (क) दि. १७.०६.१९६३ अंतर्गत, आकस्मिक आजारांची एकत्रित सुधारीत यादी सोबत जोडलेल्या परिशिष्ट 'अ' अन्वये प्रसारीत करण्यात येत आहे. सांघीक कार्यालय तसेच क्षेत्रीय कार्यालयातील सर्व नियंत्रण अधिकारी यांना विनंती करणेत येते की, सदर प्रशासकीय परिपत्रक सर्व कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आणण्यात यावे.

५. सदर प्रशासकीय परिपत्रक हे कंपनीच्या e-Library वर उपलब्ध करण्यात आले आहे.

**सोबत** - परिशिष्ट 'अ'

**(कमांडर शिवाजी इंदलकर)**(से.नि.)
**मुख्य महाव्यवस्थापक (मासं)**

## (ग) आकस्मिक आजारांची नावे

१) धनुर्वात (Tetanus)
२) अपघात (Accident)
३) आघात संलक्षन (Shock syndrome)
४) रुदवासी आणि रक्त वाहीनीशी संबंधीत (Cardiological and Vascular)
५) गर्भपात (Abortions)
६) तिव्र उदर वेदना / आंत्र आवरोध (Acute Abdominal pains / Intestinal Obstruction)
७) निश्चेतनावस्था (Coma)
८) मनोविकृतीची सुरवात (Conset of Psychiatric disorder)\
९) डोळयातील दृष्टीपटल सरकणे (Retinal detachment in the Eye)
१०) कान, नाक, व घसा यामध्ये विजातीय पदार्थ गेल्यामुळे निर्माण झालेले आकस्मिक आजार (Foreign Body in Ear, Nose and Throat emergency)
११) वायु कोथ (Gas Gangrene)
१२) ज्यामध्ये तातडीने शस्त्रक्रीया करणे आवश्यक असते अशा जन्मजात असंगती (Cogonital Anamolies requiring urgent Surgical intervention)
१३) एडस
१४) भाजणे
१५) ब्रेन टयुमर
**१६) कोविड-१९ (COVID-19)**

आकस्मिक आजारांमध्ये कोविड-१९ या नविन आजाराचा समावेश करणेबावत.

# महाराष्ट्र शासन

## सार्वजनिक आरोग्य विभाग

शासन निर्णय क्रमांकः वैखप्र-२०२०/प्र.क्र.६६/राकावि-२

१० वा मजला, गोकूळदास तेजपाल रुग्णालय आवार,

नवीन इमारत मंत्रालय, मुंबई.

दिनांक : १७ डिसेंबर, २०२०.

वाचा -

१) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग क्रमांक-एमएजी-१०८४/४१५७/सीआर-१५६, दिनांक २९ एप्रिल, १९८५.

२) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग क्रमांक-एमएजी-१०८८/३८३७/आरोग्य-९, दिनांक २३ जानेवारी,१९८९.

३) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग क्रमांक एमएजी-१०९९/प्र.क्र.४०/आरोग्य-३,दिनांक २९ जुलै, १९९९.

४) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग क्रमांक-एमएजी-१०९९/प्र.क्र.२३८/आरोग्य-३, दिनांक २१ ऑगस्ट, १९९९.

५) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग क्रमांक-एमएजी-१०९५/सीआर-४५/आरोग्य-३, दिनांक ४ जुलै, २०००.

६) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग क्रमांक -एमएजी-२००५/९/प्र.क्र.१/आरोग्य-३, दिनांक १९ मार्च, २००५.

७) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग क्रमांक एमएजी-२००५/प्र.क्र.२५१/आरोग्य-३, दिनांक १० फेब्रुवारी, २००६.

८) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग क्रमांक वैखप्र-२०१९/प्र.क्र. २३६/राकावि-२, दिनांक २७ मार्च, २०२०.

९) शासन निर्णय, महसूल व वन, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग क्र. डीएमयु-२०२०/प्र.क्र.९२/डीआयएसएम-१, दिनांक ३१ ऑगस्ट, २०२०.

प्रस्तावना -

संदर्भाधिन क्र.६ येथे नमुद करण्यात आलेल्या दिनांक १९ मार्च, २००५ च्या शासन निर्णयान्वये आकस्मिक व गंभीर आजारांची यादी प्रसिध्द करण्यात आलेली असून यांत एकुण २७ आकस्मिक आजार व ५ गंभीर आजार निश्चित केलेले आहेत. कोविड-१९ हा एक नविन आजार आहे व त्यावरील

उपचारांसाठीच्या वैद्यकीय खर्चात देखील प्रचंड वाढ झाली आहे. तसेच, संदर्भाधीन क्र. ९ च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार दिनांक २ सप्टेंबर, २०२० पासून राज्यातील सर्व शासकीय कार्यालयातील उपस्थिती वाढविण्यात आलेली आहे. कोविड-१९ चा परिणाम बहुतांशी श्वसन संस्थेवर होतो. हृदय व फुप्फुस संबंधित आजार हे संदर्भाधीन शासन निर्णय क्रमांक ६ मधील परिशिष्ट "अ" मधील अनुक्रमांक १ मध्ये समाविष्ट आहे. परंतु, शासनाचे इतर विभाग व क्षेत्रिय कार्यालयांकडून कोविड-१९ या आजारावरील उपचारासाठी वैद्यकीय खर्च प्रतिपूर्तीबाबत स्पष्टता आणण्याची मागणी करण्यात येत आहे. त्यानुषंगाने, कोविड-१९ या आजारावरील उपचारासाठी करण्यात आलेल्या वैद्यकीय खर्च प्रतिपुर्तीबाबत स्पष्टता आणण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय-**

आता, सदर शासन निर्णयांन्वये संदर्भाधीन क्र. ६ च्या शासन निर्णयांन्वये विर्निदिष्ट करण्यात आलेल्या एकूण २७ आकस्मिक आजारांमध्ये आणखी नविन १ (एक) आकस्मिक आजाराचा समावेश करण्यात येत आहे.

२८) Covid-19

वैद्यकीय खर्च प्रतिपुर्तीसाठी रुग्णाचे कोविड-१९ बाधित असल्याने वैद्यकीय अहवालात नमूद असले पाहिजे. तसेच, रुग्णाच्या रक्तातील $SPO_2$ (प्राणवायू पातळी) ही ९५ टक्के पेक्षा कमी असणे आवश्यक आहे.

२. हे आदेश दि. २ सप्टेंबर, २०२० पासून पुर्वलक्षी प्रभावाने लागू राहतील.

३. हे आदेश वित्त विभागाच्या सहमतीने व त्यांचा अनौपचारीक संदर्भ क्रमांक ५४/२०२०/सेवा-५, दिनांक ०७.१२.२०२० नुसार निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक [illegible] असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Ravindra R Gadhari

Digitally signed by Ravindra R Gadhari
DN: c=IN, o=Government of Maharashtra,
ou=Public Health Department,
postalCode=400032, st=Maharashtra,
2.5.4.20=966822bde60c3cc5b8ccd56833c0
7d3283'e4'40f3de291d1f40d510d2956431,
serialNumber=8f5b4edcac5a4c4a79542e69
'15152eb1ab864'473'f4ac3d8424b6b56a5
53e1, cn=Ravindra R Gadhari
Date: 2020.12.17 16:10:32 +05'30'

र.र. गढरी,

उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई,

२) सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,(सर्व मंत्रालयीन विभाग), मंत्रालय, मुंबई,

३) मा.राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांचे सचिव, राजभवन, मुंबई,
४) मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव/सचिव, मुख्यमंत्री सचिवालय, मंत्रालय, मुंबई,
५) मुख्यमंत्र्याचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
६) सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई,
७) मंत्री (आरोग्य) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
८) राज्यमंत्री (आरोग्य) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई,
९) सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
१०) सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई,
११) सेंटलमेंट कमिशनर ॲण्ड डायरेक्टर ऑफ लफ लॅड रेकॉर्डस, पुणे,
१२) विभागीय आयुक्त (सर्व),
१३) जिल्हाधिकारी (सर्व जिल्हे),
१४) मुख्य कार्यकारी अधिकारी, सर्व जिल्हा परिषद,
१५) महालेखापाल, महाराष्ट्र -१ (लेखा व अनुज्ञेयता)/(लेखा व परिक्षा) मुंबई,
१६) महालेखापाल, महाराष्ट्र-२ (लेखा व अनुज्ञेयता)/(लेखा व परिक्षा) नागपूर,
१७) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
१८) सहसंचालक, अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
१९) चीफ ऑडिटर लोकल फंड्स अकाऊंटस, मुंबई,
२०) सर्व कोषागार अधिकारी,
२१) संचालक, आरोग्य सेवा, मुंबई,
२२) संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई,
२३) संचालक, आयुर्वेद, मुंबई,
२४) संचालक, राज्य कामगार विमा योजना, मुंबई,
२५) व्यवस्थापकीय संचालक, हाफकीन बायो-फार्मास्युटीकल कॉर्पोरेशन, परेल, मुंबई,
२६) महासंचालक, माहिती व जनसंपर्क, मंत्रालय, मुंबई,
२७) सहसंचालक, आरोग्य सेवा (सर्व),
२८) अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय (सर्व),
२९) जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व),
३०) जिल्हा शल्यचिकित्सक, जिल्हा रुग्णालय (सर्व),
३१) प्रबंधक, मुंबई उच्च न्यायालय, मुंबई,
३२) प्रोथोनेटरी व सिनियर मास्टर, मुंबई उच्च न्यायालय, मुंबई,
३३) वित्त विभाग (कार्यासन सेवा-५), मंत्रालय, मुंबई,

३४) व्यवस्थापक, शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई,

३५) सर्व मंत्रालयीन विभाग (आस्थापना कार्यासन), मंत्रालय, मुंबई,

३६) निवड नस्ती (राकावि-२), सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई.

२. मंत्रालयीन विभागाच्या सर्व आस्थापना कार्यासनास विनंती करण्यांत येते की, त्यांनी शासन निर्णयाच्या प्रती त्यांच्या सर्व संबंधित कार्यासनांना पाठवाव्यात. तसेच, संबंधित कार्यासनाने त्यांच्या अधिपत्याखालील सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख यांना पाठवाव्यात.